# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

**:: प्रधान कार्यालय ::**
" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,
फोर्ट , मुंबई ४०० ००१, दूरध्वनी – २२६१७१ ५४ ते ५९

# महिला स्वयंसहाय्यता बचत गटासाठी कर्ज धोरण

Z:\Vaishu\Karj Dhoran 2026\Date 01.01.2026\Individual\Covering.Doc

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

प्रधान कार्यालय," मुंबै बँक भवन"
२०७, डॉ.डी.एन.रोड,फोर्ट,
मुंबई ४०० ००१

*******

## महिला स्वयंसहाय्यता बचत गट कर्ज धोरण

## दिनांक ०१/०१/२०२६ पर्यंत अद्यावत बदलासह कर्ज धोरण

बृहन्मुंबईतील आर्थिक दृष्टया दुर्बल घटक अद्यापही संस्थांत्मक / बँकिंग सेवांपासून वंचित असून त्यांना अत्यंत लहान सहान गरजा भागविणेसाठी अजूनही सावकारांवर अवलंबून रहावे लागते. वंचित घटकांना बँकांमध्ये प्रत्यक्ष पत निर्माण होत नसल्याने दैनंदिन स्वरुपाच्या तसेच लहान उद्योग व्यवसायासाठी आर्थिक गरजा भागविणेसाठी स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून त्यांच्या सभासदांना राष्ट्रीयकृत, खाजगी, जिल्हा मध्यवर्ती सहकारी व नागरी सहकारी बँका कर्ज उपलब्ध करुन देतात. राज्य बँक जिल्हा बँकांमार्फत राष्ट्रीय बँक योजनेखाली तसेच स्वसाधन संपत्तीतून बचत गटांना फेरकर्ज उपलब्ध करुन देते. बृहन्मुंबईतील स्वयं सहाय्यता बचत गटांना त्यांच्या दैनंदिन गरजा व लहान लहान उद्योग व्यवसायाकरीता अल्प व मध्यम मुदती स्वरुपाचा थेट कर्ज पुरवठयासाठी पात्रतेचे निकष व अटी पुढील प्रमाणे आहेत.

**१. उद्देश :-**

१.१ बृहन्मुंबईतील आर्थिक दृष्टया दुर्बल घटक बँकिंग सेवेपासून वंचित आहेत. त्यांच्या लहान सहान गरजा भागविणेसाठी त्यांना लघु उद्योग व्यावसायासाठी आर्थिक मदत करुन दुर्बल घटकाची बँकेत पत निर्माण करणे, राहणीमानात सुधारणा करणे.

१.२ बँकिंग सेवेपासून वंचित असणा-यांना बँकिंग सेवा देणे.

**२. पतपुरवठयाचे स्वरुप :**

१. स्वयंसहाय्यता बचत गटांना अल्प व मध्यम मुदती स्वरुपाचा कर्ज पुरवठा.

**३. कर्ज कारण :-**

व्यवसाय सुरु करणेसाठी वा त्यांच्या व्यवसाईक दैनंदिन खर्चासाठी व सभासदांच्या दैनंदिन स्वरुपाच्या गरजा भागविणेसाठी कर्ज दिले जावे.

**४. पात्रतेचे निकष :**

४.१ स्वयंसहाय्यकता बचत गट म्हणून ऐच्छिक स्वयंसेवी संस्था (Voluntary Agencies) अशासकीय स्वयंसेवी संघटना (Non - Govt. Organizations) अथवा बँकांचे शाखा व्यवस्थापक यांचे पुढाकाराने १० ते २० सभासदांचे गट स्थापन करण्यात यावेत किंवा झाले असावेत.

४.२ या गटामधील सभासदांमध्ये समान स्वारस्य, समान सामाजिक पार्श्वभूमी, समव्यावसायिक, परस्पर आपुलकी, बंधुत्वभाव इत्यादी असावे म्हणजेच गट एकजिनसी असावा. यामध्ये अल्प उत्पन्न गटातील, छोटे छोटे व्यवसाय करणारे इत्यादी प्रकारात मोडणा–या व्यक्ती असाव्यात.

४.३ गटाचे कार्यक्षेत्राजवळच्या बँकेच्या शाखेत गटांचे नावे बचत खाते उघडण्यात यावे / असावे. गटांनी अन्य बँकांमध्ये खाते उघडू नये वा उघडलेले नसावे.

४.४ बचत गटाच्या सभासदाने नियमित बचत करणे, ठेवी जमा करणे, अंतर्गत कर्जाटप करणे, व्याजदराची निश्चिती करणे, अंतर्गत निर्णय घेणे इत्यादी व्यवहार किमान ६ महिने सुरु असणे अपेक्षित आहे.

४.५ गटाने बैठकीचे कार्यवृत्त रजिस्टर, सभासद रजिस्ट, बचत आणि कर्जवाटप रजिस्टर अशा प्रकारचे दप्तर / हिशेब ठेवलेले असावेत.

४.६ बचत गट बँकेचा "ब" वर्ग सभासद असावा.

४.७ बचत गटांना कर्ज वितरण करणेपूर्वी राष्ट्रीय (नाबार्ड) बँकेने सुचविलेल्या मुद्यानुषंगाने बचत गटाचे ग्रेडेशन करणे आवश्यक आहे. "अ" दर्जा प्राप्त गटाला तसेच "ब" दर्जा प्राप्त गटास कर्ज वितरण करण्यात येईल. "क" दर्जा प्राप्त गटांचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने गटाने प्रयत्न करणे आवश्यक राहिल. सर्वसाधारणपणे ६ महिने सक्रिय असलेल्या तसेच स्वव्यवहारातून सभासदांना अंतर्गत कर्ज व्यवहार करीत असलेल्या स्वयंसहाय्यता बचत गटांचे राष्ट्रीय बँक प्रचलित निकषानुसार वर्गवारी केली जाईल.

## ५. कर्ज पुरवठयासाठी पात्रता

खालील १ ते १४ निकषानुसार (राष्ट्रीय बँक पुरस्कृत ) व सोबतच्या नमूद निकषानुसार गुणवत्ता अजमावून बचत गटांची वर्गवारी अ) उत्तम, ब) समाधानकारक क) असमाधानकारक अशाप्रकारे मुल्यमापन करण्यात येईल (परिशिष्ट क्रमांक १ पहावे)

(१) गटातील एकूण सभासद संख्या (२) सभासदांचा सहभाग (३) महिलांचा सहभाग (४) गटांच्या सभांची नियमितता (५) सभेमधील सभासदांची उपस्थिती (६) गटात चर्चा, ठराव तयार करणे यात सभासदांचा सहभाग, (७) सभासदांची बचतीची नियमितता (८) गटातंर्गत कर्ज व्यवहार (९) गटाच्या अंतर्गत कर्ज व्यवहाराकरीता गटांच्या मिळकतीचा वापर (१०) गटांची अंतर्गत कर्जाची वसुली (रक्कम) (११) अंतर्गत कर्जाचे लाभार्थी सभासद (१२) गटातील सभासदांना बचत गटाची नियमावली, कार्यपध्दती, बैठकीचे कार्यक्रम व रेकॉर्डची माहिती असल्याचे प्रमाण (१३) नेतृत्व बदल (१४) गटाने ठेवलेले पुस्तके आणि रेकॉर्ड

"अ" वर्गवारीतील गटांसाठी त्यांच्या बचतीच्या कमाल १:४ प्रमाणात तर "ब" वर्गवारीतील बचत गटांना त्यांचे बचतीच्या कमाल १:१ या प्रमाणापर्यंत कर्ज उपलब्ध करुन देता येईल. गटाच्या बचतीमध्ये बँकेतील बचत गटाच्या बचत / चालू खात्यामध्ये जमा असलेली रक्कम बचत गटाकडील रोख शिल्लक तसेच गटातंर्गत केलेल्या कर्जवितरणाची येणेबाकी याचा समावेश राहिल. "क" वर्गवारीतील गट कर्जासाठी अपात्र असतील.

मात्र स्वयं सहाय्यता बचत गटातील प्रत्येक सभासदास कमाल रु.१००००/– याप्रमाणे बचत गटातील एकूण कमाल २० सभासदांसाठी येणारी रक्कम कमाल रु.२.०० लाख पर्यंत किंवा बचतीच्या वरील प्रमाणाशी निगडीत यापैकी कमी असेल ती रक्कम सुरुवातीच्या काळात मंजूर करणेत येईल. बचत गटांना स्टेशनरी पुरविणे, मार्गदर्शन करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, ग्रेडेशन करणे इत्यादी कामासाठी बँक विभागवार समन्वयकाची नियुक्ती करेल.

**कर्ज पुरवठयाची कमाल मर्यादा**

१. स्वयं सहाय्यता बचत गट प्रथम कर्ज घेत असल्यास कर्जाची मर्यादा रु.५०,०००/- राहिल.

२. स्वयं सहाय्यता बचत गटाने प्रथम घेतलेल्या कर्जाची योग्य प्रकारे परतफेड करुन दुसरे कर्ज घेतल्यास कर्जाची मर्यादा रु.१,००,०००/- राहिल.

३. स्वयं सहाय्यता बचत गटाने दुस-यांदा घेतलेल्या कर्जाची योग्य प्रकारे परतफेड करुन तिसरे कर्ज घेतल्यास कर्जाची मर्यादा रु.२,००,०००/- राहिल. त्यापेक्षा जास्त कर्ज घेतल्यास रु.२,००,०००/- वरील कर्जाचे संपूर्ण व्याज गटास भरावे लागेल.

**कर्ज परतफेड कालावधी :-**

अ) रु.५०,०००/- पर्यंत कर्जाची परतफेड मुदत १८ महिने.

ब) रु.१,००,०००/- पर्यंत कर्जाची परतफेड मुदत ३६ महिने

क) रु.१,००,०००/- च्या पुढील कर्जाची परतफेड मुदत ४२ महिने

६. **व्याजदर :-**

पात्र बचत गटांना अल्प मुदती कर्जासाठी द.सा.द.शे.११% व मध्यम मुदत कर्जासाठी द.सा.द.शे.११% याप्रमाणे व्याजदर (Reducing Balance) आकारण्यात येईल. व्याजाची आकारणी दरमहा केली जाईल. राष्ट्रीय बँकेकडून फेरकर्ज प्राप्त झाल्यास उचल तारखेपासून राष्ट्रीय बँकेने आकारलेल्या व्याजदरावर २ टक्का वाढीव गाळा घेवून बचत गटांना व्याजदर आकारणेत येईल. मात्र असा व्याजदर सुचित व्याजदरापेक्षा जास्त राहणार नाही.

गटाकडे थकबाकी झाल्यास थकीत रक्कमेवर सांप्रत धोरणानुसार २% दंडव्याज आकारण्यात येईल. तसेच व्याजदरामध्ये वेळोवेळी होणारे बदल बंधनकारक राहतील.

बचत गटांना ४% व्याजदराने कर्ज सुविधेचा लाभ घेण्यासाठी शासन योजनेतील शासनाच्या दि ०८ ऑक्टोबर २००८ च्या शासन निर्णयातील अटी व शर्ती लागू राहतील.

७. **परतफेडीचा कालावधी / हप्ता :-**

रोख पतमर्यादा स्वरुपातील तसेच अल्पमुदती थेट स्वरुपातील कर्जपुरवठा कमाल तीन वर्षासाठी राहिल. अल्पमुदत थेट कर्जासाठी मासिक समान हप्ते निश्चित करण्यात येतील.

भांडवली स्वरुपाचा मध्यम मुदती थेट कर्जपुरवठा कर्ज कारणनिहाय तीन ते सात वर्षासाठी राहिल. या कर्जासाठी सहामाही समान हप्ते निश्चित केले जातील.

बचत गटांनी देखील त्यांच्या सभासदांचे परतफेडीचे हप्ते बँक कर्ज परतफेडीच्या हप्त्याशी निगडीत करावे जेणेकरुन बँकेचा हप्ता परतफेड करणे सोईचे होईल. राष्ट्रीय बँकेचे फेरकर्ज उपलब्ध झाल्यास राष्ट्रीय बँकेने ठरवून दिलेल्या हप्त्यानुसार हप्ते निश्चित केले जातील.

८. **उचल :-**

सभासदांची मागणी विचारात घेवून मंजूर मर्यादेवर गटाकडील अथकीत येणेबकीच्या ९०% उचल दिली जाईल.

९. **दस्तऐवज :-**

या योजनेचे उद्दिष्ट व त्यामागील भूमिका तसेच कर्जदाराची स्थिती आणि कर्ज वितरणाचे स्वरुप लक्षात घेवून पुढील दस्तऐवज करुन घेण्यात येतील.

१. कर्ज मागणी करतेवेळी सादर करावयाची कागदपत्रे (विहित नमुन्यातील)

अ. कर्ज मागणी अर्ज व सभासदनिहाय बचत व कर्ज व्यवहाराचा तपशिल

ब. ठराव (कर्ज मागणी रक्कम व कर्ज वसुलीची जबाबदारी घेणेसंदर्भात)

क. बचत गटाने संमत केलेला उपविधी

ड हिशेब पत्रके

इ. श्रेणीकरण दाखला

२. उचलीसाठी अर्जासह सादर करावयाची कागदपत्रे (विहित नमुन्यातील)

१. उचल मागणी प्रस्ताव व आवश्यक तो ठराव

२. सर्वसाधारण कुल मुखत्यार पत्र (इंटर से ॲग्रीमेंट)

३. कर्ज रोखा (महिला बचत गटांना कर्ज रोखा मुद्रांकित करण्याची आवश्यकता नाही.)

४. वचनचिठ्ठी

५. कन्टिन्युईंग गॅरन्टी

६. कर्ज रक्कम / हप्ते व त्यावरील व्याज निर्धारित वेळेत परतफेड न झाल्यास अथवा रक्कम थकीत झाल्यास अशी थकीत रक्कम त्यावरील व्याजासह बचत गटाचे बँकेतील चालू अगर बचत खाती नावे टाकून करुन घेण्याचे बचत गटातील सर्व सभासदांच्या सहीचे अधिकार पत्र.

७. बचत गटाचे अन्य बँकेत कोणत्याही प्रकारचे खाते नसल्याबाबत तसेच अन्य बँकेकडून कर्ज घेतले नसल्याबाबतचे गट प्रमुखाचे प्रतिज्ञा पत्र.

८. कर्ज परतफेडीस वैयक्तिक व सामुहिक जबाबदार असल्याबाबतचे सर्व सभासदांचे हमीपत्र/ करारनामा.

१० **इतर शर्ती :-**

१. गटाची सर्व कागदपत्रे (रेकॉर्डस) हिशेबाची पुस्तके इत्यादी बँकेच्या अधिका–यास तपासणीसाठी उपलब्ध करुन दिली पाहिजेत.

२. बचत गटाने हप्त्यांची व्याजसह परतफेड न केल्यास सदरची रक्कम गटाच्या बचत / चालू खात्यातून परस्पर कर्ज खाती वर्ग केली जाईल.

३ सभासदांची कर्ज मागणी विचारात घेवून मंजूर मर्यादेइतपत गटातील अथकीत येणेबाकीच्या ९०% उचल दिली जाईल.

४. बँकेने मंजूर केलेल्या कर्जाच्या व्याजदरापेक्षा २% पेक्षा जादा व्याजदराने बचत गटांना त्यांचे सभासदांना कर्जावर व्याजदर आकारता येणार नाही.

५. बचत गटाच्या सभासदांना चेकद्वारे कर्जवाटप करणे बंधनकारक राहिल.

या अटी व शर्तीची पूर्तता बचत गटांनी करणे बंधनकारक राहिल व त्यात कोणताही बदल करण्याचा अधिकार बँकेस राहिल.

स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना व गटाचे बँकेत खाते उघडण्याची पध्दती याबाबतचा तपशिल.

**अ) स्वयंसहाय्यकता बचत गटाची स्थापना :**

१. स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना, स्वयंसेवी संस्था (Voluntary Agencies) अशासकीय स्वयंसेवी संघटना (Non Govt. Organizations), अथवा बँकेच्या शाखा व्यवस्थापकांच्या पुढाकाराने व्हावी.

२. बचत गट ज्या विभागात स्थापन करावयाचा आहे त्या विभागातील सामाजिक कार्यकर्ता अथवा जेष्ठ व्यक्तींशी संपर्क साधून प्रथम त्यांना बचत गटाची संकल्पना समजावून सांगावी व त्यांच्या सहयोगाने विभागातील इच्छुक महिला / पुरुष यांची सभा घेवून त्यांना बचत गट स्थापनेचे महत्व व फायदे समजावून द्यावेत.

३. समान स्वारस्य, समान सामाजिक पार्श्वभूमी, समव्यवसायिक, परस्परसंबंधी आपुलकी व बंधुत्वभाव असणा-या व्यक्ती एकत्र जमवून त्यांचे गट स्थापन करणेत यावेत.

४ सभासद हे आर्थिक दृष्टया दुर्बल असावेत व एका कुटुंबातील एकच व्यक्ती गटाचा सभासद असावी. बचत गटामध्ये १० ते २० सभासदांचा समावेश असावा.

५. सभेची वेळ, जागा, बचतीची रक्कम, सभासदांच्या संमतीने निश्चित करण्यात यावी.

६. बचत गटाचे कामकाज योग्य प्रकारे चालण्यासाठी सभासदांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. सभासदास प्रशिक्षण देत असतांना पायाभूत गणित शास्त्र, नोंदी ठेवणे, सभांची अनुसूची तयार करणे, बँकेशी व्यवहार करण्यासंदर्भातील प्राथमिक ज्ञान देणे इत्यादी बाबींवर भर देण्यात यावा.

**ब) स्वयंसहाय्यता बचत गटाचे बँकेत खाते उघडण्याची पध्दती :**

१. बँकेचे बचत / चालू खाते उघडण्याचा विहित नमुन्यातील अर्ज बचत गटाकडून भरुन घेण्यात यावा.

२. स्वयंसहाय्यता बचत गटाच्या नावे (उदा. अहिल्या स्वयंसहाय्यता बचत गट ) बचत / चालू खाते उघडण्यात यावे.

३. स्थापित झालेल्या बचत गटाकडून गट प्रमुख, सचिव, खजिनदार किंवा इतर पदाधिका-यांच्या निवडीबाबतचा ठराव खाते उघडताना घेण्यात यावा.

४. बँक खात्यावर व्यवहार करण्याचे अधिकार ज्या पदाधिका-यांना / सभासदांना दिलेले आहेत. त्यांचे दोन फोटो, वास्तव्याचा दाखला यामध्ये रेशनिंग कार्ड, इलेक्ट्रिसिटी बील, वाहन चालविण्याचा परवाना किंवा निवणूक ओळख पत्र यापैकी एकाची छायांकित प्रत घेण्यात यावी.

५. पॅनकार्ड किंवा रेशनिंग कार्ड बाबत आग्रह धरु नये.

६. अशिक्षितांचे अंगठयास शाखाधिका-यांनी दस्तूर लावावे.

७. बचत गटातील सभासदांची नावे व पत्ते घेण्यात यावेत.

८. बचत गट रजिस्टर केला असेल तर त्याबाबतचे पत्र घ्यावे.

९. बचत गटातील सभासदाचे वैयक्तिक बचत खाते उघडावयाचे असल्यास सदर खातेदाराच्या खात्यातील जमा रक्कम कमीत कमी रु.१००/- इतकी असावी अशी सवलत देण्यात यावी.

१३६



**(बचतगट वर्गवारी)**

**परिशिष्ट क्रमांक – १**

| अ क्र | निकष | प्रतवारी | | गुण | अभिप्राय मिळालेले गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | गटातील एकूण सभासद | १ | १६ ते २१ | ५ | |
| | | २ | ११ ते १५ | ३ | |
| | | ३ | १० पेक्षा कमी | २ | |
| २ | सभासदांचा सहभाग | १ | उद्दिष्ट असलेला ग्रुप (बी.पी.एल) | ५ | |
| | | २ | १ ते २ उद्दिष्ट नसलेले सभासद | ३ | |
| | | ३ | २ पेक्षा जास्त उद्दिष्ट नसलेले सभासद | १ | |
| ३ | महिलांचा सहभाग | १ | १००% | ५ | |
| | | २ | ७५ ते ९९% | ३ | |
| | | ३ | ७५% पेक्षा कमी | १ | |
| ४ | गटांच्या सभांची नियमितता | १ | आठवडी | ५ | |
| | | २ | पंधरवाडी | ३ | |
| | | ३ | मासिक | २ | |
| | | ४ | ठराविक कालावधी नाही | ० | |
| ५ | सभेतील सभासदांची उपस्थिती | १ | ९०% पेक्षा जास्त | १० | |
| | | २ | ७० ते ९०% | ५ | |
| | | ३ | ५० ते ७०% | २ | |
| | | ४ | ५०% पेक्षा कमी | ० | |
| ६ | गटात चर्चा, ठराव तयार करणे यात सभासदांचा सहभाग | १ | चांगल्या स्वरुपाचा | ५ | |
| | | २ | मध्यम स्वरुपाचा | ३ | |
| | | ३ | निम्न स्वरुपाचा | २ | |
| ७ | सभासदांची बचतीची नियमितता | १ | ९०% पेक्षा जास्त सभासद | १० | |
| | | | नियमित बचत ७५% पेक्षा जास्त ९०% पेक्षा कमी | ७ | |
| | | ३ | ५०% पेक्षा जास्त ७५% पेक्षा कमी | ५ | |
| | | ४ | ५०% पेक्षा कमी | ० | |
| ८ | गटांतर्गत कर्ज व्यवहार | १ | गट स्थापनेनंतर ६ महिन्यात सुरु | ५ | |
| | | २ | ६ महिन्यानंतर सुरु | २ | |
| | | ३ | सुरुवातच नाही | ० | |
| ९ | गटांच्या अंतर्गत कर्ज | १ | ९०% पेक्षा जास्त | १० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | व्यवहाराकरीता गटांच्या मिळकतीचा वापर | | | | |
| | | २ | ७१ ते ९०% | ७ | |
| | | ३ | ३० ते ५०% | ५ | |
| १० | गटांची अंतर्गत कर्जाची वसुली (रक्कम) | १ | १००% | १० | |
| | | २ | ८० ते ९९% | ७ | |
| | | ३ | ७० ते ७९% | ५ | |
| | | ४ | ७०% पेक्षा कमी | ० | |
| ११ | अंतर्गत कर्जाचे लाभार्थी सभासद | १ | ५०% पेक्षा जास्त | ५ | |
| | | २ | २५ ते ५०% | ३ | |
| | | ३ | २५% पेक्षा कमी | २ | |
| १२ | गटातील सभासदांना बचत गटाची नियमावली, कार्यपध्दती, बैठकीचे कार्यक्रम व रेकॉर्डची माहिती असल्याचे प्रमाण | १ | सर्व सदस्यांना माहित आहे. | ५ | |
| | | २ | ५०% व त्यापेक्षा जास्त सदस्यांना माहित आहे | ३ | |
| | | ३ | ५०% व त्यापेक्षा कमी सदस्यांना माहिती आहे. | २ | |
| १३ | नेतृत्व बदल | १ | प्रत्येक वर्षी | ५ | |
| | | २ | १-२ वर्षामधील | ४ | |
| | | ३ | दोन वर्षातून एकदा | २ | |
| १४ | गटाने ठेवलेली पुस्तके आणि रेकॉर्ड | | | | |
| अ | सभेचे कार्यक्रम रजिस्टर | बाहेरील कोणाच्या मदतीशिवाय | | १५ | |
| ब | खतावणी रजिस्टर | बाहेरील कोणाच्या मदतीने | | १० | |
| क | बचत खाते रजिस्टर | रेकॉर्ड अर्धवट ठेवले आहे. | | ५ | |
| ड | कॅशबुक | | | | |
| इ | अंतर्गत पासबुक | | | | |

**स्वयंसहाय्यता गटाचे मुल्यमापन :**

| अ.क्र | गुण मर्यादा | अभिप्रायानुसार प्रतवारी |
|---|---|---|
| अ | ८० पेक्षा जास्त गुण | सक्षम व पात्र गट |
| ब | ६० ते ७९ गुण | साधारण गट |
| क | ६० पेक्षा कमी गुण | कमकुवत गट |

(टिप - कमकुवत बचत गट असल्यास कर्ज मंजूरीच शिफारस करु नये.)

## स्वयंसहाय्यता बचत गटाने कर्ज मागणीसाठी बँकेला करावयाचा अर्ज

## फॉर्म नं.१

स्वयंसहाय्यता बचत गटाचे नाव : -----------------------------------------

पत्ता : -----------------------------------------------------

-------------------------------------------------------

-----------------------------------------------------

स्थापना दिनांक --------------- नोंदणीकृत आहे / नाही.

**नोंदणीकृत असल्यास नोंदणी क्रमांक व दिनांक :**

**(नोंदणी पत्राची सत्यप्रत जोडावी)**

गटाचे एकूण सभासद प्रत्येक मासिक बचत रुपये ( )

सेवाभावी संस्थेचे / प्रेरकाचे नांव व पत्ता: ---------------------- हुद्दा ------

-------------------------------------------------------------

स्थळ : दिनांक :

**प्रति,**

मा.व्यवस्थापक / शाखा व्यवस्थापक

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., मुंबई

--------------------------------- शाखा

महोदय,

**विषय :- कर्ज मागणीसाठी अर्ज.**

आम्ही वरील स्वयंसहाय्यता गटाचे अधिकृत प्रतिनिधी गटाच्या सभासदांना कर्ज देण्यासाठी रु.----/- (अक्षरी रु. ------------------------) कर्जाची मागणी करीत आहेत.

१. गटाची दिनांक --------- अखेरची आर्थिक पत्रके व दिनांक ---------- च्या कर्ज मागणी ठरावाची नक्कलप्रत सोबत जोडली आहे.

२. बँकेने ठरवून दिलेल्या हप्त्याप्रमाणे कर्जाची परतफेड करण्यास आम्ही तयार आहोत.

३. गटाच्या सर्व सभासदांनी गटाच्यावतीने कर्ज घेण्यासाठी आम्हाला दिलेल्या अधिकाराच्या करारपत्रांची प्रत सोबत जोडली.

४. वर दिलेली सर्व माहिती आमच्या समजूतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

५. गटाची कर्ज विषयक व इतर माहिती शासन व नाबार्ड तसेच बँकेला आवश्यक वाटेल त्या वित्तीय संस्था यांना देण्यास आमची हरकत राहणार नाही.

६. आम्ही गटाविषयी दिलेली कोणतीही माहिती खोटी व चूकीची आढळून आल्यास या अर्जाद्वारे आम्ही मागितलेले कर्ज ---------------- नाकारण्याचा वा -------- कर्जाची रक्कम पूर्ण / अंशत: परत मागण्याचा अधिकार बँकेस राहिल.

आपले विश्वासू,

संघटक / संघटिका / अध्यक्ष सहसंघटक /सहसंघटीका/उपाध्यक्ष सचिव

बचत गट

स्वयंसहाय्यता गटाचे नाव -------------------------------------

## दिनांक ------------- अखेर गटाची आर्थिक माहिती.

| अ. क्र | तपशिल | रक्कम (रुपये) |
|---|---|---|
| १ | सभासदांची एकूण बचत | |
| २ | सेवाभावी संस्थेचे बीजभांडवल | |
| ३ | बचत गटाचे बँक कर्ज देणेबाकी | |
| ४ | सभासदांकडून येणे कर्जबाकी | |
| ५ | सभासद येणेकर्जाची थकबाकी | |
| ६ | कर्ज वसुलीचे शेकडा प्रमाण | |
| ७ | गटाची बँकेतील शिल्लक व रोख शिल्लक | |

**संघटक / संघटिका/अध्यक्ष सहसंघटक /सहसंघटिका/उपाध्यक्ष सचिव**
**बचत गट (सहया) / शिक्का**

**फॉर्म नं.२**

स्वयंसहाय्य बचत गटाचे नाव : ----------------------------------------
दिनांक ---------------------- रोजी झालेल्या मासिक सभेच्या ठराव क्रमांक ------
-- ची खरी नक्कल

**विषय :- मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. या बँकेच्या ------------ ---- शाखेकडून व बचत गटाच्या सभासदांसाठी घ्यावयाच्या कर्जाबाबत...**

**ठराव क्रमांक :** **दिनांक :**

बचत गटाच्या सभासदांच्या कर्ज मागणीवर चर्चा होवून यादीप्रमाणे गटाच्या सभासदांसाठी रु.--- -------/- (अक्षरी रु. --------------------------------------) कर्जाची मागणी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मुंबई शाखा ---------------------- यांच्याकउे करण्याचे ठरविण्यात आले आहे. गटाच्यावतीने बँकेकडून ------------ मासिक हप्ते परतफेडीचे कर्ज मागणी करण्याचे, कर्जाच्या सर्व कागदपत्रावर तसेच दस्तऐवजांवर सहया करण्याचे, गटाची मालमत्ता तारण देण्याचे, कर्ज घेवून सभासदांना वाटप करण्याचे, कर्जवाटप करतांना सभासदांकडून आवश्यक कागदपत्रे करुन घेण्याचे, कर्जातून घेतलेली रक्कम तपासण्याचे, सभासदांकडून कर्जाची वसुली करुन बँकेच्या कर्जाची परतफेड करण्याचे अधिकार गटाच्या खालील प्रतिनिधींना देण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे.

१. श्री./श्रीमती -------------------------- संघटक / संघटिका/ अध्यक्ष
२. श्री./श्रीमती ------------------------ सहसंघटक /सहसंघटिका/ उपाध्यक्ष
३. श्री/श्रीमती -------------------------------- सचिव / खजिनदार

सहयांचे नमुने : १) ------------------------------------
२) ------------------------------------
३) ------------------------------------

**ठराव सर्वानुमते मंजूर**
**(खरी नक्कल)**

**संघटक / संघटिका / अध्यक्ष सहसंघटक/सहसंघटिका / उपाध्यक्ष सचिव**
**बचत गट (सहया ) (शिक्का)**

ठरावाची नोंद प्रत्यक्ष प्रोसिडींगला नोंद असल्याची खात्री केली आहे.
तपासणीस / शाखा व्यवस्थापक
--------------------- शाखा

दिनांक :
(ठरावाची नोंद प्रत्यक्ष प्रोसिडींगवरुन असल्याची खात्री करुनच तपासणीस यांनी सही करावी.)

**फॉर्म नं. २ अ**

गटाचे नाव : -------------------------------------------------
-

बचत गटाची बँक कर्ज मागणी ठराव तसेच अधिकार प्रदान केल्याबद्दल ठरावास गटाच्या सर्व सभासदांची संमतीबाबत सहया –

| अ. क्र | गटसभासदांचे नाव | ठरावास संमतीबाबत सही |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| ५ | | |
| ६ | | |
| ७ | | |
| ८ | | |
| ९ | | |
| १० | | |
| ११ | | |
| १२ | | |
| १३ | | |
| १४ | | |
| १५ | | |

| | | |
|---|---|---|
| १६ | | |
| १७ | | |
| १८ | | |
| १९ | | |
| २० | | |

(सदर माहितीत गटाच्या सदस्यांच्या सहया असणे आवश्यक आहे. अंगठा देणा-या सभासदांच्या निशाणी अंगठयास गटाचे अध्यक्ष किंवा सचिव यांनी दस्तूर करावा.)

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.**
**शाखा ---------------------**

जा.क्र. दिनांक :

**प्रति,**
मा.सरव्यवस्थापक
मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित
मुख्य कार्यालय, मुंबई

**विषय :- ----------------- (महिला/पुरुष) स्वयंसहाय्यता बचत गट वॉर्ड ---------- जिल्हा ------------ या बचत गटाच्या बँक कर्ज प्रकारण** शिफारशीबाबत.
**संदर्भ :१) उपरोक्त गटाचा बँक कर्ज मागणी अर्ज दिनांक**

संदर्भिय विषयान्वये विनंती की, बचत गटाच्या कर्ज प्रस्तावाची छाननी केली असून त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

१. बचत गटाचे नाव वॉर्ड ------------------------
२. स्थापना दिनांक -------------------------
३. एकूण सदस्य संख्या ------- पैकी स्त्रिया ----------- पुरुष -----------
४. पैकी दारिद्रय रेषेखालील एकूण सदस्य संख्या ------ पैकी स्त्रिया ----- पुरुष -----
५.अ गटाची एकूण मासिक बचत रक्कम रु. ----------------------
ब प्रति सभासद मासिक बचत रक्कम रु. ----------------------
६. दिनांक ------------- अखेर गटाची एकूण बचत रक्कम रु. ---------------
(अद्ययावत ताळेबंदानुसार किंवा भेट तारखेस)
७ दिनांक ---------- अखेर गटाने आपल्या सदस्यांनी दिलेले अंतर्गत कर्ज रु.-------
(अद्ययावत ताळेबंदानुसार किंवा भेट तारखेस )
८. दिनांक --------------- अखेर अंतर्गत कर्जाची फेड रु. --------------

९. दिनांक ---------- अखेर सभासद अंतर्गत कर्ज येणेबाकी रु.--------------

१०. गटाची बचत नियमितपणे होत आहे.

११. गटाची अंतर्गत कर्जफेड नियमित आहे.

१२. गटाच्या मासिक सभा नियमित होतात.

१३. गटाने यापूर्वी बँकेचे --------- वेळा कर्ज घेतले असून त्याची नियमित परतफेड केली आहे. सदर कर्ज प्रस्ताव शिफारस करतेवेळी गटाकडे बँकेचे कर्ज येणेबाकी रु. ---------/- आहे / नाही.

१४. गटाने अंतर्गत कर्ज वाटपासाठी रु.------------/- ची कर्ज मागणी केली आहे.

सदर बचत गटाचे मुल्यांकन तपासणीस -------------- शाखा यांनी केले असून गटास ------------------- गुण असल्याने गटास रु.--------------- बँक कर्ज मंजूरीसाठी शिफारस आहे.

आपला विश्वासू,

**शाखा व्यवस्थापक**

**--------------- शाखा**

विभागीय अधिकारी ----------------------- विभाग यांचेमार्फत सविनय सादर.